"Emancipation of Women in a Socialist State"

Vasanti Deshpande

# समाजवादी देशातील स्त्री-मुक्तीची वाटचाल

पुरुषप्रधान कुटुंब पद्धतीतील विचारांमुळे, रूढींमुळे, संस्कारांमुळे अमुक एक काम बाईचेच–अमुक एक काम हे पुरुषाचे अशा काही कल्पना आपल्या डोक्यात घट्ट बसलेल्या असतात. घरात रांधणारा तो पुरुष कसला किंवा घरातलं सगळं नीटनेटकं न करणारी ती बाई कसली असं बायकांनाच वाटत असतं. बाई कितीही शिकली, मोठी झाली तरी चूल आणि मूल हे तिचं प्रथम कर्तव्य असं आपण मानतो. अमेरिका, इंग्लंडसारख्या पुढारलेल्या भांडवलदारी देशांतसुद्धा बायका जरी शिकल्या, बाहेर काम करत असल्या तरी सुद्धा घरकाम आणि मुले सांभाळण्याचे काम अजूनही मोठ्या प्रमाणावर त्यांच्यावरच आहे. अर्थातच त्यामुळे तेथील स्त्री मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या क्षेत्रात पुढे येऊ शकत नाही. स्त्री ही पुरुषाची उपभोग्य वस्तू मानली गेल्यामुळे तिचे स्थान कनिष्ठ आहे. जाहिरातीत ती सर्रास वापरली जाते. वेश्या व्यवसायात ती आहे. अमेरिकेत बलात्कार हा सर्वात वाढणारा गुन्हा आहे.

भारतासारख्या मागासलेल्या देशात तर बाईची अवस्था ही आपल्यापैकी प्रत्येकीला पावलोपावली बोचणारी गोष्ट आहे. शिक्षण नाही, नोकरीत प्राधान्य नाही, बेकारी एवढी प्रचंड आहे की बायकांना कुठे काम मिळणार ? हे सगळे खरे. पण आज जगात असे काही देश आहेत की ज्या देशांतील सर्वसामान्य जनतेने, कामगार, शेतकरी स्त्री-पुरुषांनी समाजवादी क्रांती करून हे चित्र बदलले आहे. या देशातील स्त्रियांचे आर्थिक व सामाजिक स्थान कसे बदलले, या स्त्रिया कोणकोणती कामे करतात, तेथील कामाच्या सोयी इत्यादी गोष्टींची माहिती करून घेणे आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. कारण आपल्याला त्यामधून शिकण्यासारखे बरेच आहे.

## अंतराळात झेपावणारी व्हेलेंटिना : रशियन स्त्रियांमधील एक

क्रांतीपूर्व काळातील रशियन स्त्री ही अतिशय मागासलेली, दडपलेली स्त्री होती. तिला अतिशय हीन समजले जाई. घरी नवऱ्याच्या वर्चस्वाखाली ती पिचली जात होती तर कारखान्यात फार वाईट परिस्थितीत तिला खूप राबावे लागे. पैसे कमी मिळत. कसल्याही तऱ्हेच्या सोयी, संरक्षण नव्हते. ८०% स्त्रिया मोलकरीणी, नोकर म्हणून काम करीत होत्या. फक्त १३% स्त्रिया उद्योगधंदे, बांधकाम या क्षेत्रात होत्या.

खाजगी मालकीवर, नफेखोरीवर आधारलेली, कोटयवधींच्या पिळवणुकीतून मूठभरांचे ऐश्वर्य फुलवणारी अन्यायाची समाजव्यवस्था मोडून टाकून कष्ट करणाऱ्यांचे राज्य स्थापन करणारा जगातील पहिला देश म्हणजे रशिया. त्यानंतर चीनमध्ये क्रांती झाली. आणि सर्वात अलिकडचा देश म्हणजे व्हिएटनाम. या देशांतील जनता स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी झटते आहे. माणसामाणसातील भेद-भाव नाहीसा करण्यासाठी ती प्रयत्न करते आहे. अर्थातच हा काही लहानसहान झगडा नाही. वर्षानुवर्षे चालणारा हा प्रचंड लढा आहे. त्यात उणिवा आहेत, दोष आहेत. परंतु तेथे निश्चित सुरवात झाली आहे. वाटचालही चालू आहे.

पहिल्या महायुद्धाच्या काळात आणि त्यानंतरच्या रशियन समाजवादी क्रांतीमध्ये पुरुष युद्धात गुंतल्यामुळे रशियन स्त्रिया मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडल्या.

पुरुषांच्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्यामुळे उत्पादक कामात त्या सहभागी झाल्या. नवे तंत्र शिकू लागल्या. रशियन समाजवादी क्रांतीच्या विजयानंतर अवघ्या वर्षभरानें [१९१९ साली] स्त्री-पुरुष समानता स्थापन करणारे कायदे झाले. पुरुषांचे कुटुंबातील कायदेशीर वर्चस्व रद्द केले. उत्पादक कामात भाग घेणे हा प्रत्येक स्त्रीचा हक्क मानण्यात आला. अर्थातच केवळ कायद्याने स्त्रियांना समान हक्क देऊन प्रश्न सुटणार नाही याची त्यांना जाणीव होती. घरकामाच्या जोखडातून मुक्त होऊन आर्थिक दृष्टया स्वतःच्या पायावर उभी राहिल्याशिवाय खरी स्त्री-पुरुष समानता येऊच शकत नाही. समाज जीवनात ती सहभागी होऊ शकत नाही. म्हणून माता आणि कामगार या दोन्ही जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडता याव्यात म्हणून स्त्रियांना खास सवलती आणि हक्क मिळाले. कौटुंबिक जबाबदारी आणि घरकामातून तिची सुटका व्हावी म्हणून जास्तीत जास्त प्रयत्न झाले.

(१) सार्वजनिक भोजनगृहे, घरकामात यंत्रांची मदत.
(२) सार्वजनिक सेवांची वाढ.
(३) बालसंगोपन गृहे.

या सोयींमुळे गृहिणी आणि माता म्हणून स्त्रीची बरीच जबाबदारी समाजाकडून उचलली जाते.

(१) बाळंतपणासाठी भर पगारी रजा.
(२) कायम नोकरी
(३) आई व मुलाला वैद्यकीय मदत.
(४) अंगावर पिणाऱ्या मुलासाठी दर चार तासांनी अर्धा तास सुट्टी.
(५) नोकरीनंतर निवृत्तीवेतन.

रशियानंतर ज्या ज्या देशांत समाजवादी क्रांती झाली त्या प्रत्येक देशानेच ह्या सर्व सोयी केल्या आहेत. स्त्री-पुरुष समानता वास्तवात प्रस्थापित होण्यासाठी, वेगळ्या वेगळ्या व्यवसायांत तिने पुरुषाच्या बरोबरीनें पुढे येण्यासाठी या गोष्टी आवश्यक आहेत.

आज रशियात ८४ टक्के स्त्रिया उद्योगधंदे, बांधकाम, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, शासकीय संस्था इ. ठिकाणी आढळतात. धातुउद्योगात २७ टक्के व कापड उद्योगात २५ टक्के असे प्रमाण आहे. तसेच संशोधन उच्च शिक्षण, राजकारण इ० क्षेत्रातही स्त्रिया दिवसेदिवस पुढे जात आहेत.

## वादळी समुद्राचे आव्हान स्वीकारणाऱ्या चिनी स्त्रिया !

आज चीनमधील प्रत्येक स्त्री ही काम करते आहे. क्रांतीच्या आधी सुद्धा चिनी स्त्री काबाडकष्ट करीत होती. पण ते तिच्यावर लादलेले, तिला गुलाम बनवणारे कष्ट होते. क्रांतीनंतर एकंदर समाजाच्या बांधणीत तिला निश्चित स्थान व उपयुक्त सहभाग मिळाला. काम करण्याची क्षमता ही स्त्री-पुरुष भेदावर अवलंबून नसते, जे काम पुरुष करू शकतो ते काम बाईसुद्धा करू शकते, या विचाराचा जोरदार प्रचार करण्यात आला, स्त्रीच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी, स्त्रियांच्या दृष्टिकोनात बदल करण्यासाठी. आजवर खोल रुतलेल्या जुन्या संस्कृतीची पाळेमुळे उखडून टाकण्यासाठी वेगवेगळे मार्ग वापरले गेले. शाळेतील पाठ्यपुस्तकातील गोष्टीरूपाने, कॅलेंडर्सवरील चित्रांच्या सहाय्यानें, छोटया छोटया चित्रपटांच्या मदतीने अशा अनेक मार्गांने जुने विचार बदलण्याचे प्रयत्न झाले. चीनमधे स्त्री-पुरुषांना सारख्या कामासाठी सारखे वेतन मिळते. कारखान्यात आणि शेतावर स्त्री-पुरुष बरोबरीने कामे करतात. स्थानिक पातळीवर उत्पादनासंबंधी निर्णय घेणाऱ्या आणि व्यवस्थापनाचे काम पाहणाऱ्या कामगार समित्यांमधे मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा सहभाग आहे. आज चीनमधील स्त्री, पुरुषांच्या बरोबरीने अवजड ट्रक्स, बुलडोझर्स चालविते. ती वैमानिक, शास्त्रज्ञ, कुशल तंत्रज्ञ आहे. एकूण डॉक्टर्सपैकी निम्म्या स्त्री डॉक्टर्स आहेत.

**दर्यावर्दी चिनी स्त्री**—कोणत्याही कोळी जमातीला असे ठामपणे वाटते की, 'समुद्रात जाऊन मासे पकडायचे काम फक्त पुरुषांचे ! स्त्रियांनी फक्त घरात बसून कामे करावीत.' पण १९५८ मध्ये माओ-त्से-तुंग यांनी सर्व चिनी जनतेला खूप मोठ्या प्रमाणात काम करून साम्यवाद बळकट करण्याचे आव्हान केले. एक १८वर्षाची कोळ्याची मुलगी ! तिने आपल्या देशाच्या क्रांतीकार्यात सहभागी व्हायचे ठरविले. रुढी मोडून आपण समुद्रात मासे

यला जायचे ठरविले. तीन मैत्रिणींना बरोबर घेऊन तिने कम्यूनशी संपर्क साधला. कम्यूनमध्ये तिच्या सूचनेचा विचार करण्यात आला. धाडसी विचार करून त्याप्रमाणे कृती करण्याचे नवे वळण चिनी स्त्रियांना मिळत होते. या धाडसी विचारांची वार्ता जेव्हा आजू-बाजूला पसरली तेव्हा अनेकांना ही गोष्ट अशक्य वाटत होती. "आम्ही काही लुळ्या-पांगळ्या नाहीत, मग आम्ही समुद्रात का जाऊ शकणार नाही ?" असे म्हणून या स्त्रियांनी जिद्दीने कामाला सुरवात केली. "८ मार्च" नावाचे बोटीचे केंद्र सुरू झाले. अनेक स्त्रिया या केंद्रात सामील होऊ लागल्या. बोटीसंबंधीची तांत्रिक माहिती मिळविण्यास त्यांनी सुरवात केली. चांगल्या प्रकारचे मासे कसे आणि कोणत्या भागातून मिळतील यासाठी समुद्राचा अभ्यास करावयास त्यांनी सुरवात केली. वादळी समुद्राचे आव्हान स्वीकारणाऱ्या या दर्यावर्दी, धीट चिनी स्त्रियांनी देश संपन्न करण्यात सहभाग घेतला आहे.

**पोलादी स्त्रिया**–ज्याप्रमाणे समुद्रात चिनी स्त्रिया यशस्वीपणे संचार करू शकतात त्याचप्रमाणे अन्य महत्त्वाच्या क्षेत्रातही त्या पुढे जात आहेत. उत्पादन आणि शास्त्रीय प्रयोग यांमध्ये सहभागी होण्यासाठी ताची येथे सर्व प्रथम मुलींचा गट स्थापन झाला. आज अशा प्रकारे काम करणारे चीनमध्ये ४५७ गट आहेत. या गटांमध्ये ५२०० स्त्रिया आहेत. अत्यंत कष्टाची कामे करण्यास या पोलादी स्त्रिया सतत तयार असतात. ताछी येथे पावसाच्या सतत माऱ्यामुळे सर्व गावच धुतले गेले. धरणे फुटली, पीके वाहून गेली, घरे कोसळली पण ताछीच्या पूर्नरचनेसाठी या स्त्रिया पुढे सरसावल्या. कोणतेही मेहनतीचे काम करण्यास या स्त्रिया तयार असतात. जंगलामध्ये पूल बांधण्याचे काम स्त्रिया स्वीकारतात. इलेक्ट्रीशिअन्स् म्हणूनही त्या काम करतात. एप्रिल, १९७० मध्ये ११० मिटर लांबीचा पूल बांधण्याचे काम बायकांच्या तुकडीने केले.

## व्हिएतनाम मुक्तिलढ्यातील लाखो स्त्रियांची भागीदारी – एक जिवंत, स्फूर्तिदायक वास्तव

प्रथम फ्रेंच आणि नंतर अमेरिकन साम्राज्य-वाद्यांशी वर्षानुवर्षे झगडणाऱ्या व्हिएटनामी स्त्रीची वेगवेगळ्या क्षेत्रातील कामगिरी तर फारच स्फूर्तिदायक आहे. व्हिएटनाममध्ये व्हिएटनाम मुक्ती लढ्याबरोबरच स्त्री–मुक्ती चळवळ अस्तित्वात आली. १९३० मध्येच कम्युनिस्ट पार्टीने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे हा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मान्य केला.

**लांब केसाचे सैन्य**–व्हिएटनाम मुक्ती लढ्यात लाखो स्त्रियांनी भाग घेतला. १९५२ साली फ्रेंचांविरुद्ध झगड-ताना उत्तर व्हिएटनामी गनिमी सेनेमध्ये ८,४०,००० स्त्रिया होत्या. दक्षिण व्हिएटनाममध्ये २,४०,००० स्त्रिया होत्या. बोटावर मोजण्यासारख्या दोघी-चौघी नाही तर लाखो स्त्रिया लढल्या. व्हिएटनामच्या स्वातंत्र्यसेनेत दर पाच सैनिकात एक स्त्री-सैनिक होती. एका हाताने भाताची रोपे लावत असतानाच दुसऱ्या हातात मशिनगन आणि हातबांब घेऊन ती सज्ज होती. विमान विध्वंसक दलात तिने अमेरिकेची बाँबफेकी विमाने अचूक टिपली. किनाऱ्यालगतच्या प्रदेशात कुशल नेमबाजीने तिने अमेरिकन युद्धनौकांची होळी पेटवली. टेहळणी पथकात तिने सुरुंग शोधून काढून सैनिकांसाठी रस्ते सुरक्षित ठेवले. जंगलात तिने गुप्त वाटा तयार केल्या.

'उट टिच' या गनिमी योद्धेची कहाणी इतर लाखो कहाण्यातलीच एक आहे. शत्रूवर छुपे हल्ले करून युद्ध-सामुग्री पळविण्यात ती तरबेज होती. ती सहा मुलांची आई होती. पण आपल्या खेड्यातील शाळा आणि शेजारी पाजारी आपल्या मुलांची नीट देखभाल करतील याची तिला खात्री होती. १९६५ मध्ये एका लढ्यात तिने एक हेलिकाप्टर पाडले आणि ३५ शत्रू सैनिकांना ठार केले. ती एका मोठ्या गनिमी पथकाचे नेतृत्व करीत असे. स्त्रिया स्वतः लढत होत्याच. पण लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या, युद्धतंत्राचे शिक्षण देणाऱ्या सुद्धा स्त्रिया होत्या. व्हिएटनामी स्त्रीने जगाला दाखवून दिले आहे की स्त्री अबला नाही. स्व-संरक्षणासाठी तिला पुरुषावर अवलंबून राहायची गरज नाही.

## उत्पादनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांची आगेकूच

व्हिएटनाममध्ये सहकारी पद्धतीने शेती केली जाते. १९६१ साली, म्हणजे सहकारीकरणाची मोहीम सुरू झाल्यानंतर एक वर्षाने सहकारी गटात ३० लाख

स्त्रिया सामील झाल्या. एकूण शेतमालापैकी ७५ टक्के शेतमालाचे उत्पादन स्त्रिया करतात. सहकारी व्यवस्थापन समित्यावरील १५ सभासदांपैकी ११ स्त्रिया असल्याचे आढळून आले. त्या गुरे राखतात, नांगर चालवितात, यांत्रिक पंपांचा उपयोग आणि दुरुस्ती हे त्यांचे नेहमीचे काम आहे. बियाणांची निवड, गुदाम व्यवस्था, पशूपालन, शेतीतील नवे शोध या सर्व कामाची जबाबदारी स्त्रियाच घेतात. बॉंब वर्षावामुळे नापीक झालेली जमीन परत लागवडीयोग्य बनविण्यासाठी वेगवेगळे प्रयोग सुद्धा त्या करतात.

कारखाने आणि इमारत बांधकामातील स्त्रियांच्या भागीदारीमुळे १९५४ ते १९६१ या काळात स्त्री कामगारांची संख्या दहा हजारावरुन सत्तर हजारांवर गेली. कारखान्यांमध्ये स्त्रियांचे ध्येय एकच आहे–' एका कौशल्यामध्ये उत्तम प्राविण्य मिळवा आणि त्याचबरोबर इतरही अनेक कौशल्यांचा परिचय करून घ्या.'

व्हिएटनामी स्त्री–संघटना ही एक मोठी बलाढ्य संघटना आहे. ५० लाख स्त्रिया तिचे सभासद आहेत. १०,००० कार्यकर्त्या सतत काम करत फिरत असतात. स्त्रियांना नव्या नव्या कामासाठी प्रवृत्त करत असतात. हस्तकला वगैरेमधून स्त्रियांना पूरक उत्पन्न मिळावे म्हणून अनेक केंद्रे चालवितात.

१९५४ मधे ' नाम दिन्ह ' नावाची फ्रेंच लोकांच्या मालकीची फॅक्टरी व्हिएटनामने ताब्यात घेतली. तेथे स्त्री–कामगारांनी व्यवस्थापनाचे कामही स्वतःवर घेतले. त्यानंतर अमेरिकन बॉंब हल्ल्याचे ते प्रमुख लक्ष बनले. त्या वेळी तेथील स्त्री–कामगारांनी दिवसपाळचा थांबवून रात्री काम केले. " मिन्ह थी सिम " नावाच्या एका २३ वर्षाच्या मुलीने त्या फॅक्टरीच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी घेतली. अमेरिकेच्या वेगवेगळ्या विमानांचे गुण-दोष याबद्दल तिचे ज्ञान अचूक होते. अशा प्रकारे स्त्रिया फक्त कामगार नाहीत. त्या फॅक्टरीच्या व्यवस्थापक आणि संरक्षक सुद्धा आहेत.

सर्व जनतेला शिक्षित करण्याची मोठी कामगिरी स्त्रियांनीच पार पाडली आहे. आज तेथे ९० टक्के स्त्रिया साक्षर आहेत. शिक्षणक्षेत्रांतील कर्मचाऱ्यांमध्ये ८० टक्के स्त्रिया आहेत. आरोग्य क्षेत्रातील कर्मचाऱ्यां ७५ टक्के स्त्रिया आहेत.

संपूर्ण व्हिएटनाम देश हे एक मोठे कुटुंब आहे. आजवर शत्रूशी सामना करण्यासाठी तेथील स्त्री पुरुषांनी कंबर कसली. शेतात, कारखान्यात स्त्री राबल्या कोणी मुले सांभाळली, कोणी स्वयंपाक केला आणि प्रत्येकजण सर्व शक्तीनिशी शत्रूवर तुटून पडला. कोणी म्हणेल आता युद्ध संपले. आता परत स्त्री घर-चूल-मूल यात बंदिस्त होणार – तर ते पूर्णपणे चूक होईल कारण व्हिएटनामी स्त्री जागरूक आहे. लढाऊ आहे संघटित आहे. तिथला समाज वेगळी मूल्ये व वेगळ्या उत्पादन पद्धतीवर उभारला आहे. युद्धात बेचिराख झालेले राष्ट्र संपन्न बनविण्याच्या कामात, बॉंबहल्ल्यात पंगू झालेल्या, अनाथ झालेल्या लाखो लोकांच्या पुनर्वसनाच्या कामात, उद्ध्वस्त झालेली शहरे पुन्हा बसविण्यात, रस्ते बांधण्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया काम करीत आहेत. अधिकाधिक स्वतंत्र होत आहेत.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर १५० वर्षांनी इंग्लंडमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. अमेरिकेसारख्या अतिशय श्रीमंत, प्रगत देशामध्ये आजही स्त्रियांना वेगवेगळ्या क्षेत्रात काम मिळविण्यासाठी, समान कामाला समान वेतन मिळविण्यासाठी झगडावे लागत आहे. निग्रो स्त्रीला गोऱ्या स्त्रीपेक्षा, गोऱ्या स्त्रीला गोऱ्या पुरुषापेक्षा कनिष्ठ स्थान आहे म्हणून आवाज उठवावा लागतोय. पण रशिया, चीन, व्हिएटनाम यासारख्या समाजवादी देशांत मात्र स्त्री-पुरुष समानतेचे कायदे केव्हाच झाले. नुसते कायदे झाले नाहीत तर ते राबविण्यासाठी सतत प्रयत्न होत आहेत. वेगवेगळ्या व्यवसायात स्त्री पुढे जात आहे. पाळणाघरे, सामुदायिक स्वयंपाकघरे यामुळे घरकामाच्या जाचातून ती बाहेर पडत आहे. यावरून आपल्याला असे म्हणावे लागेल की, जोपर्यंत भांडवलदारी उत्पादन पद्धती असते, पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्था असते, नफ्यासाठी उत्पादन होते, कामगार आपली श्रमशक्ती विकतो, स्त्रीकडे वस्तू म्हणून पाहिले जाते तोपर्यंत माणसा माणसात आणि म्हणूनच स्त्री-पुरुषात समानता येणार नाही.

–वासंती देशपांडे